**Press Clippings**

| Publication | Edition | Date | Page Number | Subject |
|---|---|---|---|---|
| KESARI | Mumbai | 28/5/2016 | 2 | Mintage World |
| | | | | |

# जगातील पहिले ऑनलाईन म्युझियम 'मिंटेज वर्ल्ड'चे उद्घाटन

**पुणे :** प्राचीन आणि वर्तमानकाळातील नाणी, मुद्रा व चलनी नोटा यांचे जगातील पहिले ऑनलाईन म्युझियम मिंटेज वर्ल्डचे उदघाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले.

आधुनिक भारताला आणि देशातील तरूणांना प्राचीन आणि वर्तमान काळातील नाणी, मुद्रा यांचा संग्रह करण्यातील आनंद देणे हा www.mintageworld.com या ऑनलाईन म्युझियममागचा उद्देश असून इथे एकाच ठिकाणी मुद्रा, वैश्विक नाणी आणि चलनी नोटा यांबद्दल सविस्तर माहिती देण्यात आली आहे. तसेच त्यामध्ये अधिकृत घराणे, राजघराणे, राज्यकर्ते यांच्या काळातील नाण्यांची रंजक माहितीही देण्यात आली आहे.

हे ऑनलाईन म्युझियम नुकतेच सुरू झाले असून नोंदणीनंतर येथे सर्वांनाच मोफत ॲक्सेस मिळणार आहे. यावरील प्रत्येक माहितीचे अचूकता योग्य संदर्भग्रंथात आणि तंत्रज्ञानाद्वारे काटेकोरपणे तपासून पाहण्यात आली असून संशोधक, तज्ञ आणि दशकभराचा अनुभव असणारे क्युरेटर अशी टीम सोबत असल्याने हे म्युझियम विश्वासार्ह आहे. तसेच येत्या काळात होणारे सर्व प्रकारचे राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय कार्यक्रम, सेमिनार, चर्चासत्र आणि बातम्या अशी सर्व प्रकारची माहिती या पोर्टलवर मिळणार आहे.